RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On:12 April 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 April,2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : दहा | एप्रिल २०१५



सावन शाह जी आओ (भजन) 4

भजनांचे महत्व (संदेश) 6

परमात्म्याची भक्ती (सत्संग) 11

लग्न (संदेश) 29

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

सावन शाह जी आओ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी परमसंत बाबा सावन सिंहजी महाराज यांच्या वियोगजन्य आठवणीत रचलेले भजन

सावन शाह जी आओ, दर्श दिखाओ,
कई जन्मां दे, रोग मिटाओ, (२)

१. दर्श बिना सानूं, चैन ना आवे,
इक-इक पल, युग बीत दा जावे, (२)
काल दी नगरी चों, आण बचाओ,
कई जन्मां दे .....

२. मै गुनाहागार तूं, बक्शनहारा,
समझो यतीन आ, देवो सहारा, (२)
बेड़ी मझदार चों, पार लगाओ,
कई जन्मां दे ....

३. डाकु लुटेरे, फिरन चुफेरे,
दया करो दाता, जीव हां तेरे, (२)
काल दे पंजे चों, आण छुड़ाओ,
कई जन्मां दे ...

४. गरीब 'अजायब' दी सुण अरजोई,
तेरे बिना किते, मिलदी ना ढोई, (२)
सावन शाह जी आओ, देर ना लगाओ,
कई जन्मां दे ....

कठीण शब्दांचा भावार्थ:
बेड़ी - नाव, मझदार चों - वादळातून, चुफेरे - चोहो बाजूंनी, अरजोई - विनंती, ढोई - आसरा



भजनांचे महत्व

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी भजन गाण्याच्या कार्यक्रमाप्रारंभी प्रेमींना दिलेला एक महत्मपूर्ण संदेश, राजस्थान – १५ जानेवारी, १९८०

उठ जाग मुसाफिर भोर भई, अब रैन कहाँ जो सोवत है।
जो सोवत है सो खोवत है, जो जागत है सो पावत है।
उठ नींद से अक्खियां खोल जरा और अपने गुरु से ध्यान लगा।
यह प्रीत करन की रीत नहीं, गुरु जागत है तू सोवत है।।

आता पप्पू ने भजन गायले की, ही प्रीत करण्याची पद्धत नाही, गुरू जागत आहे व तू झोपून राहिला आहेस. हे एक सत्य आहे. संसारिक लोकं जेव्हा झोपतात तेव्हा त्यांचा आत्मा मन–इंद्रियांच्या कक्षेत असतो व पूर्णपणे मन–इंद्रियांच्या वशभूत झालेला असतो परंतु त्यांच्या आणि संतांच्या झोपण्यांत फरक आहे. संताचा आत्मा वरच्या मंडळात जातो, संत झोपलेले असताना देखील कोणा ना कोणा व्यक्तीचा सांभाळ करत असतात, कोणाला दर्शन देत असतात, म्हणून ते सदैव जागृत असतात.

मुसलमानांमध्ये राबिया बसरी नामक खूप ध्यान–साधना केलेली प्रसिद्ध महात्मा होऊन गेली. एकदा तिने पूर्ण रात्र झोपून काढली, तेव्हा तिच्या प्रेमी भक्तांना अनुभव झाला की राबिया बसरी मृत्यू पावलेली आहे. सर्व भक्तांना खूप दु:ख झाले. जेव्हा सकाळी प्रेमी भक्त तिच्याकडे आले तेव्हा त्यांनी पाहिले की, ती जिवंत होती. सर्व भक्तांनी आप–आपला अनुभव सांगितला. राबिया बसरी म्हणाली,''आपला अनुभव योग्य आहे. मी रात्री झोपले होते, माझी तब्बेत चांगली नव्हती, म्हणून मी उठू शकले नाही. आपल्याला असा अनुभव होणे स्वाभाविकच होते.'' कबीर साहेब सांगतात:

तेरे नाम दा भरोसा भारी रक्खीं लाज प्यारेयां दी।
नाम जपो जी ऐसे ऐसे ध्रुव प्रह्लाद जपयो हर जैसे।
ध्रुव प्रह्लाद जपयो हर जैसे, रक्खीं लाज प्यारेयां दी।।

कबीर साहेब ह्या भजनात समजावतात की, ज्याप्रमाणे भक्त ध्रुव प्रह्लाद यांनी हरीची भक्ती केली, त्याप्रमाणे तुम्ही नाम जपा. ध्रुवाच्या वडिलांची दोन लग्ने झाली होती. त्याचे वय फार लहान होते. ध्रुव आनंदात बाहेर खेळत होता. पित्याच्या हृदयांत प्रेम आले, त्यांनी ध्रुवास आपल्या मांडीवर बसविले. त्याच्या सावत्र आईच्या मनात खूप द्वेष व मत्सर उत्पन्न झाला. तिने ध्रुवास पित्याच्या मांडीवरून उठविले व सांगितले, ''जर तुला आपल्या पित्याच्या मांडीवर बसायचे होते, तर माझ्या पोटातून जन्म घ्यायचा होतास.'' ध्रुवाने आपल्या आईला विचारले की, ''तू ह्या घरची दासी आहेस की, राणी आहेस?'' त्याच्या आईने प्रेमाने त्यास कडेवर उचलले व म्हटले, ''मुला! मी राणी आहे, परंतु मी पूर्वजन्मी चांगली कर्मं केली नाहीत, म्हणून माझी ही अवस्था आहे.'' तेव्हा ध्रुव आईस विचारू लागला,''आई! तू मला हे सांग की, असे कोणते साधन आहे, ज्यामुळे मला शत्रू आपले मित्र वाटू लागतील?'' आई म्हणाली,''नामाची साधना कर, तू पवित्र होशील.''

ध्रुवाच्या हृदयात वैराग्य निर्माण झाले की, अशा परमेश्वराच्या नामाची भक्ती केली पाहिजे ज्यामुळे शत्रू पण मित्र दिसू लागतील. नारदाच्या मनात विचार आला की, जर कोणी गुरूंशिवाय भक्ती करत असेल तर त्यास राम देखील स्वीकारत नाही. हा लहान आहे, त्यास तर हे देखील माहित नाही की, गुरू प्राप्त होणे किती गरजेचे आहे.

आमचे सतगुरू महाराज सांगत असत, ''निसर्गाचा नियम आहे की, भुकेल्याला अन्न आणि तहानलेल्याला पाणी जरूर मिळते.'' जर आपली तीव्र इच्छा असल्यास, मग भले त्यावेळी कोणी महात्मा ह्या संसार मंडळात असो वा नसो, परमात्मा कोणत्या-ना-कोणत्या सचखंडात पोहोचलेल्या महात्म्यांना हुकूम देतात की, आपण ह्याला नामाशी जोडा. नारदाने तिथे प्रगट होऊन ध्रुवास नामदान दिले. ध्रुवाने वेळ व्यर्थ दवडला नाही, त्याने नामाची साधना केली.

जेव्हा राजास कळले की, माझा मुलगा उदास होऊन प्रभुची भक्ती करण्यासाठी घरातून निघून गेला आहे, तेव्हा राजाने ध्रुवास सांगितले, ''तू राज्य कर. मी वयोवृद्ध झालेलो आहे, मी भक्ती करेन.'' तेव्हा ध्रुवाने सांगितले की, मला या राज्याची गरज नाही, कारण हे राज्य सोबत जाणार नाही, या संसारातील सामान इथेच राहील, सोबत जाणार नाही.''

हार चले गुरुमुख जगजीता।

दुनियादार ह्या संसारात नेहमी स्वत: जिंकल्याचा दावा करतात, परंतु महात्मा दुनियेत येऊन कधीच भांडण–तंटा करीत नाहीत. ते दुनियेत जीत प्राप्त करण्याची इच्छा करीत नाहीत कारण येथील जीत किंवा पराजित आपल्यासोबत जाणार नाही. आपल्यासोबत केवळ शब्द–नामाची ध्यान–साधना जाईल किंवा आपल्यासोबत सतगुरू जातील. मग आपण का बरं त्यांच्यावर प्रेम करू नये, ज्यांनी आपल्याला साथ द्यायची आहे?

तसेच एकदा प्रह्लादाचे पिता हिरण्यकश्चपच्या हृदयांत अहंकार आला की, माझ्यापेक्षा मोठा कोणी प्रभू नाही. सर्वांनी माझीच भक्ती करावी, मी सर्वांचा बादशाह आहे. सर्व प्रजा त्याचे नाव जपू लागली.

जल हिरण्यकश्चप थले हिरण्यकश्चप।
है भी हिरण्यकश्चप होसी भी हिरण्यकश्चप।।

ईश्वर खूप दयाळू असतो. तो जिवांना आपल्याशी मिळवण्यासाठी स्वत: साधन बनवतो. ईश्वराने हिरण्यकश्चपच्या घरांत आपला भक्त प्रह्लाद यास जन्मास घातले. सर्व जनता हिरण्यकश्चपचे नाम जपत होती, परंतु प्रह्लादाने बंड केले आणि सांगितले, ''हिरण्यकश्चप परमात्मा नाही. परमात्मा वेगळीच शक्ती आहे, परमात्म्याजवळ अहंकार नाही, हा अहंकारी आहे.''

सर्वांनी प्रह्लादास समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रह्लादाने संसारिक लोकलाज सोडून, पित्याबरोबर बंड करून, गुरूंकडून शब्दनाम प्राप्त केले व नामाची साधना केली. हिरण्यकश्चपने प्रह्लादाचा निरनिराळ्या प्रकारे छळ

केला. त्यास कष्ट दिले. हिरण्यकश्चपने त्याला तप्त खांबास चिकटवले व सांगितले की, ''तुझा राम असेल तर त्याने येऊन दाखवावे.'' इतिहासात उल्लेख येतो की, ईश्वराने एका मुंगीचे रूप धारण करून खांबावर चढायला सुरुवात केली. प्रह्लादाच्या मनांत विचार आला की, ईश्वर प्रत्येकाचे रक्षण करतो. जेव्हा तो छोट्या मुंगीची रक्षा करत आहे, तर माझे रक्षण का नाही करणार? त्याने आनंदाने खांबास मिठी मारली, तेव्हा तप्त खांब थंड झाला.

कबीर साहेब सांगतात, अशा दृढविश्वासाने नाम जपा जसे ध्रुव आणि प्रह्लादाने लहान वयात नाम जपले व ते यशस्वी झाले. गुरूसाहेब सांगतात:

जुग जुग भक्ति उपाय कै, पैज रखदा आया रामा।

प्रत्येक युगांत ईश्वराने आपले प्रिय भक्त पाठविले, जर दुनियेने ईश्वराच्या भक्तांना काही कष्ट दिले किंवा त्यांची कोणती परीक्षा घेतली तर परमेश्वराने त्या भक्तांवर खूप दया केली, अंतरातून मदत केली व त्यांची लाज राखली.

हिरण्यकश्चप दुष्ट हर मारिया, प्रह्लाद तराया रामा।

हिरण्यकश्चपला शिक्षा दिली, त्याचा वध केला. ह्या दुनियेत प्रह्लादाची किर्ती आहे. आज लोक हिरण्यकश्चपला दुष्ट आणि प्रह्लादाला भक्त म्हणतात.

अहंकारिआ निन्दकां पीठ दे, नामदेव मुख लाया रामा।

त्याकाळी भारतात लोक जाती–पाती मानत असत. नामदेव रंगारी (कपडे रंगवणाऱ्या)जातीचे होते. एके दिवशी ते मंदिरात गेले असता पुजाऱ्यांनी त्यांना खूप तुच्छ लेखिले की, हा खालच्या जातीचा मंदिरात का आला आहे? हा कसा काय परमात्म्याची भक्ती करू शकतो. परमात्म्याची भक्ती केवळ उच्च जातीचेच लोक करू शकतात.

पुजाऱ्याने नामदेवजींचा अपमान केला. नामदेवजींना धक्के मारून मंदिरातून बाहेर काढले. नामदेवजी मंदिराच्या मागच्या बाजूला जाऊन बसले. तेव्हा परमात्म्याने मंदिराचा दरवाजा मागच्या बाजूला केला. परमात्म्याने अहंकारी लोकांकडे पाठ फिरवली आणि भक्ताच्या बाजूला तोंड केले.

जिन नानक ऐसा हर सेविया, लै अंत छुड़ाऐ रामा।

ज्यांनी परमात्म्याची भक्ती व नामस्मरण केले,परमात्म्याने त्यांचे रक्षण केले. आपण देखील परमात्म्याची भक्ती करावयास हवी. भक्तीला ओझे समजू नये, कोणावर उपकार करीत आहोत असे समजू नये व अहंकार करू नये. भक्ती करणे म्हणजे स्वत:वर दया करणे आहे, कोणावर उपकार करणे नव्हे. मन लावून ध्यान–नामस्मरण करा. स्वामीजी महाराज सांगतात:

अपने जीव की दया पा लो, चौरासी का फेर बचा लो।

***

दिल्ली शहरातील कार्यक्रम

२२ ते २४ मे २०१५

कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार, नवी दिल्ली – ११० ०८७

(मो.: ९८१०२१२१३८, ९८१०७९४५९७, ९८१८२०१९९९)

परमात्म्याची भक्ती

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, सूफीसंत शेख फरीद साहेबांची वाणी
मुंबई, महाराष्ट्र – १३ जानेवारी १९८७

बंधुनो! दररोजप्रमाणे सुफी संत शेख फरीद साहेबजींची वाणी आपणांसमोर सादर केली जात आहे. सुफी या शब्दाचा अर्थ 'निर्मळ हृदय', ज्या हृदयात केवळ नामाचाच वास असतो, कोणा प्रती तिरस्कार नसतो, कारण सर्वांच्या अंतर्यात परमात्मा निवास करतो. फरीद साहेब सतत ध्यान–अभ्यासामध्ये समरस रहात असत. सुरुवातीला त्यांना शब्द–नामाचा मार्ग प्राप्त झालेला नव्हता, त्यामुळे ते बराच काळ जंगलात फिरत असत. फरीद साहेबांना जीवनात निरनिराळ्या प्रकारचे खूप अनुभव आले. एके दिवशी जंगलातून परत येत असताना त्यांना खूप भूक लागली. भूक मृत्युपेक्षाही वाईट असते. आपण सकाळी अन्न खाल्ले तरी संध्याकाळी पुन्हा भूक लागते, तसेच संध्याकाळी जेवलो तरी सकाळी पुन्हा भूक लागते. आपण सांगता:

फरीदा मौतों भुख बुरी, राती सुत्ता खाके तड़के फेर खड़ी।

एक मनुष्य खरबूज खात–खात वाटेने चालला होता. त्याने खरबूज खाऊन टाकलेली साले, फरीद साहेब उचलून खाऊ लागले, कारण ते खूप भुकेलेले होते. तेवढ्यात खरबूज खात जाणारा मनुष्य तेथे परत आला. त्याने फरीद साहेबांना विचारले,''माझा चाकू वाटेत पडला, तो तू उचललास काय?'' फरीद साहेबांनी त्या मनुष्यास खूप समजावले,''मी खरबूजाची साले जरूर खाल्ली, परंतु तुझा चाकू काही उचलला नाही. जर का मला तुझा चाकू दिसला असता, तर मी तुला नक्कीच तसे सांगितले असते.'' परंतु जर एखाद्या व्यक्तीस त्याच्या अहंकाराचे प्रदर्शन करावयाचे असल्यास, जबरदस्ती करावयाची असल्यास, त्यास आपण कितीही समजावण्याचा प्रयत्न केला, गयावया केली, तरीही तो ऐकत नाही.

त्या मनुष्याने फरीद साहेबांना मारले तरी फरीद साहेब हसत होते. तो मनुष्य फरीद साहेबांना विचारू लागला,''मी तुला मारहाण करीत असूनही तू का बरे हसत आहेस?'' त्यावर फरीद साहेब म्हणाले:

जिन्निआं खुशीया मांणियां तेते लग्गे रोग। छिल्ला कारण मारीए फल खाए क्या होग।।

ते म्हणाले,''मी यासाठी हसत आहे की केवळ साले खाल्ल्यानंतर जर मला एवढा मार खावा लागत असेल तर फळ खाल्ल्यानंतर किती मार खावा लागेल?'' फरीद साहेब त्यांच्या वाणीमध्ये उल्लेख करतात की मनुष्याने इतका ध्यान-अभ्यास करावा की त्याचे शरीर चिरल्यास त्यामधून रक्ताऐवजी पाणी बाहेर पडावे. काही शिष्यांनी गुरू अमरदेवजींसमोर हाच प्रश्न मांडला की, फरीद साहेबांनी त्यांच्या वाणीमध्ये लिहिले आहे की मनुष्याने इतका ध्यान-अभ्यास करावा की शरीर चिरल्यास त्यामधून रक्ताऐवजी पाणीच बाहेर पडावे. असे म्हणणे बरोबर आहे की यामध्ये काही उणीव आहे?

गुरू अमरदेवजी महाराजांनी त्या शिष्यांना अत्यंत प्रेमाने समजावले की, शरीर रक्ताशिवाय असूच शकत नाही. जे लोक परमात्म्याची भक्ती, तप करतात, त्यांच्या अंतरामध्ये लोभरूपी रक्त बाकी राहत नाही, कारण त्यांना परमात्म्याचे तसेच मृत्युचे भय वाटत असते की, मृत्युनंतर त्यांनादेखील कर्मांचा हिशोब द्यावा लागणार आहे, म्हणूनच त्यांच्या अंतरातील लोभरूपी रक्त लोप पावते. ज्याप्रमाणे सोने अग्नीच्या झोतात विरघळून शुद्ध होते, त्याचप्रमाणे त्यांचे रक्तदेखील शुद्ध बनते.

पुढे गुरू अमरदेवजींनी एक सुंदर गोष्ट सांगितली. एका जंगलामध्ये कुमूत नामक ऋषी तपश्चर्या करीत होते. एके दिवशी ते ऋषी तप करून उठले असता त्यांच्या पायास काटा टोचला. त्यांनी तो काटा पायातून काढला असता, पायामधून रक्त आले नाही, कारण ते आयुष्यभर तप करत होते. रक्त न आलेले पाहून ते ऋषी आनंदाने नृत्य करू लागले. हर्षोल्हसित

होऊन त्यांना नृत्य करताना पाहून त्यांच्या सोबत पशु-पक्षीदेखील नृत्य करू लागले. देवांनी शंकरास विनंती केली,''हे पहा काय चाललं आहे? आपणदेखील आयुष्यभर खूप तप केले, आपण यास समजावून सांगा.''

शंकराने तेथे येऊन ऋषीस विचारले की, तू अशाप्रकारे नृत्य का करीत आहेस? त्यावर ऋषी म्हणाले की, मी सर्वांपेक्षा अधिक तप केले असून मी सर्वश्रेष्ठ आहे. माझ्या शरीरामधून रक्ताऐवजी पाणी बाहेर आले. शंकरानेदेखील खूप तप-अभ्यास केला होता. त्या ऋषींचा अहंकार दूर करण्यासाठी शंकराने स्वत:चे शरीर चिरून त्यांना दाखविले आणि म्हणाले:

अहंकारया सो मारया।

तप-अभ्यास करण्यामागे हाच उद्देश असतो की आपल्या अंतरात नम्रता व दीनता निर्माण व्हावी. फरीद साहेबजींची वाणी लक्षपूर्वक ऐका:

फरीदा रत्ती रत न निकलै जे तन चीरै कोय।
जो तन रत्ते रब स्यों तिन तन रत न होय।
एह तन सभो रत है रत बिन तन न होय।
जो सह रत्ते आपणे तित तन लोभ रत न होय।
भै पइऐ तन खीण होय लोभ रत विच्चों जाय।
ज्यों बैसंतर धात सुध होय त्यों हर का भौ दुरमत मैल गवाय।
नानक ते जन सोहणे जे रत्ते हर रंग लाय।।

आपण प्रेमाने समजावता, प्रियजनहो! रक्ताशिवाय शरीर असूच शकत नाही. जे लोक अंतरामधून प्रभु परमेश्वराशी, ध्वनीशी एकरूप होतात, त्यांच्या अंतरामधील लोभ नष्ट होतो. ते अशाप्रकारे स्वच्छ होतात जसे सोने अग्नीच्या उष्णतेने शुद्ध होते. परमात्म्याच्या दरबारात ते शोभायमान दिसतात, तेथे त्यांचा सन्मान होतो.

फरीदा सोई सरवर ढूंढ लहो जित्थों लब्भी वत्थ।।
छप्पड़ ढूंढै क्या होवै चिक्कड़ डुबै हत्थ।।

फरीद साहेब सांगतात,''आपण अशा लोकांची संगत करावी,जेथे आपले जीवन सार्थकी लागेल. परमार्थ मार्गावरून दूर भटकलेले आपले मन परमात्म्याच्या भक्तीत समरस होईल व आपण **परमात्म्याची भक्ती** करू शकू. आपल्यावर आपल्या संगत–सोबतीचा खूप जबरदस्त परिणाम होतो. आपण जर कुसंगतीत गेलो, तर आपल्या अंतरात कुविचार निर्माण होतात. तसेच सत्संगतीत राहिल्यास आपल्या अंतरातदेखील सद्गुण निर्माण होतात.''

एकदा एक राजहंस सांडपाण्याच्या डबक्यात बसला होता. त्या डबक्यात त्याने चोच मारली असता, चोचीत घाणच येत असे. त्या राजहंसास फरीद साहेब म्हणाले, तू सरोवरामध्ये जा. कारण तुझा खुराक मोती तेथे आहेत. या डबक्यात तुला काय प्राप्त होणार? याचप्रमाणे आपणदेखील सत्पुरुषांच्या सहवासात जाऊन त्यांच्या संगतीचा फायदा करून घ्यावयास हवा.

फरीदा नंढी कंत न रावयो वड्डी थी मुईआस।।
धन कूकेंदी गोर में तै सह ना मिलीआस।।

तरुणावस्थेचा कालावधीच भक्ती करण्याचा योग्य अवधी होता. खरेतर त्याचवेळी **परमात्म्याची भक्ती** करून आपले जीवन सफल करावयास हवे होते. परंतु आपला देह कबरीत गेल्यानंतर आपण कबरीत जाऊन अपेक्षा करतो की, आपणांस परमात्मा भेटावा व त्याने आपणांस माफ करावे.

फरीदा सिर पलया दाढ़ी पली मुच्छां भी पलीआं।।
रे मन गहिले बावले माणह् क्या रलीआं।।

फरीद साहेब प्रेमाने समजावतात, तुझ्या दाढी–मिश्या तसेच डोक्यावरील केसही पिकले आहेत, तरी देखील तुझे मन अजूनही परमात्म्याकडे वळत नाही, भोग–विलास व संसारिक गोष्टींकडेच तुझा अजूनही ओढा आहे.

फरीदा कोठे धुक्कण केतड़ा पिर नीदड़ी निवार।।
जो देंह लधे गाणवें गए विलाड़ विलाड़।।

आता फरीद साहेब सांगत आहेत, जर एखादा मनुष्य घराच्या छतावर चढून धावू लागल्यास तो किती अंतर दूर जाईल? केवळ पंचवीस–पन्नास फूटच दूरवर जाईल, कारण पुढे जाण्यासाठी जागाच नसते. हीच अवस्था या जन्माची आहे. आपणांस परमात्म्याने मोजकेच दिवस आणि मोजकेच श्वास दिलेले आहेत. तू गाफील मनाच्या मागे लागून हे श्वास वाया घालवू नकोस. हे शरीर थोड्या वर्षांकरीताच लाभलेले आहे. त्यापैकी काही वर्षे बालपणात तर काही वर्षे तारुण्याच्या बेपर्वाईमध्ये निघून जातात. अखेरीस वार्धक्य येते तेव्हा सर्दी–कफ, संधी–वात यांसारख्या व्याधी शरीरास जडतात. तू या अल्प–जीवनानंतर कोठे जाशील?

फरीदा कोठे मंडप माड़ीआं एत न लाए चित।।
मिट्टी पई अतोलवीं कोय न होसी मित।।

आपण प्रेमाने सांगता की, तू या जगामध्ये हृदय गुंतवून बसला आहेस की माझे घर सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ असावे, त्यामध्ये सुंदर नक्षीकाम केलेले असावे. परंतु दुर्दैव! येथे कोणी राजा असो वा प्रजा असो अथवा एखादा मोठा धर्मगुरू असो, मृत्यूनंतर त्याच्या देहावर मातीच पडेल. अशा संसारिक गोष्टींशी प्रेम करून काय उपयोग? देह दफन केल्यास त्यावर खूप माती टाकली जाते व देहास अग्नी दिल्यास त्याचे रूपांतर मूठभर राखेत होते.

फरीदा मंडप माल न लाय मरग सताणी चित धर।।
साई जाय समाल जित्थै ही तौ वंजणा।।

फरीद साहेब आपणांस सावधान करीत आहेत की संसारिक वस्तू, घर–वाडे, मालमत्ता यांमध्ये तुझे हृदय गुंतवू नकोस. तू ते ठिकाण पाहून घे

जेथे मृत्युनंतर तुला जाऊन रहायचे आहे, कारण तेथे, तुझे आई–वडिल, बंधु–भगिनी, मित्रमंडळी कोणीही तुझ्या सोबत येणार नाहीत.

अमल जो कीते दुनी विच सिर दरगाह आए काम।

आपण करीत असलेली कर्मंच, तेथे आपली साक्षीदार बनतील. ती कर्मंच आपली साथ–सोबत करणार आहेत.

फरीदा जिनीं कंमीं नाहिं गुण ते कंमड़े विसार।।
मत सरमिंदा थीवही सांई दै दरबार।।

ज्या कामांची परमेश्वरद्वारी किंमत नाही, अशी कामं करण्याचे तू टाळ, जेणेकरून परमात्म्याच्या दरबारात तुझी लज्जास्पद अवस्था होणार नाही.

महात्मा एक गोष्ट सांगत असत की एक वेश्या होती. तिने एकदा तिच्या दासीला सांगितले,''शेजारी एक मनुष्य मरणोन्मुख अवस्थेत आहे. तेव्हा तू तेथे जाऊन पाहा की तो स्वर्गामध्ये गेला की नरकामध्ये?''

तेथून जवळूनच एक महात्मा जात होते. त्यांनी विचार केला! मरणोपरांत एखादा मनुष्य स्वर्गामध्ये जाणार की नरकामध्ये, याचे या बाईस ज्ञान कसे बरे आहे? आणि याचे आकलन तिच्या दासीला कसे होईल? ही बाब समजून घेणे जरूरी आहे असा विचार करून महात्मा तेथेच बसले. काही वेळाने ती दासी परतली आणि आपल्या मालकीणीस म्हणाली, ''तो मनुष्य स्वर्गामध्ये गेला आहे.''

महात्मांनी त्या दासीला विचारले, ''मुली! तो मनुष्य स्वर्गात गेला की नरकात हे तुला कसे समजले?'' दासी म्हणाली, ''महात्म्यांद्वारा असे ऐकले आहे की, मृत्युनंतर ज्या मनुष्याचे चांगले गुणगान लोक करतात, तो मनुष्य नक्कीच स्वर्गात जातो. ज्याच्या मृत्युनंतर लोक त्याच्याबद्दल वाईट–साईट बोलतात की बरे झाले हा गेला, हा अत्याचार करणारा, लोकांना त्रास देणारा होता, तो मनुष्य नक्कीच नरकात जातो.''

फरीद साहेब सांगतात, ''तुम्ही अशीच कर्मं करा, ज्यायोगे परमात्म्याच्या दरबारात गेल्यावर तुम्हांस लज्जास्पद वाटणार नाही.''

फरीदा साहिब दी कर चाकरी दिल दी लाह भरांद।।
दरवेसां नों लोड़ीऐ रूक्खां दी जीरांद।।

फरीद साहेब सांगत आहेत, ''तू **परमात्म्याची भक्ती** कर. सर्वप्रथम तू विश्वास ठेव की मी जे काही काम करीत आहे ते चांगले आहे, ते परमात्म्यास मान्य असावे. परमात्म्याची भेट होईल की नाही अशा द्विधा मन:स्थितीत तू राहू नकोस. हृदयामधून हा भ्रम तू काढून टाक. ज्यांना ठाम विश्वास असतो, त्यांना परमात्मा नक्कीच भेटतो, त्यांना तो स्वत:च्या घरात स्थान देतो. परंतु परमात्म्याचे भक्त बनणे सर्वात अवघड काम आहे.'' कबीर साहेब सांगतात:

फकीरा फकीरी दूर है जैसे पेड़ खजूर।
चढ़ गया ते अमर फल गिर गया ते चकनाचूर।

परमात्म्याचे प्रियजन एखाद्या कचऱ्याच्या ढिगासमान असतात. त्या ढिगावर कोणी चांगले फळ टाकतो किंवा कचरा टाकतो या गोष्टीचे ते प्रियजन वाईट वाटून घेत नाहीत, शांत राहून ते सहन करतात. त्याचप्रमाणे फरीद साहेब वृक्षाचे उदाहरण देतात. त्या वृक्षास कोणी कापावे, कोणी पाणी घालावे, कोणी दगड–विटा मारावेत, याचे तो वृक्ष वाईट वाटून घेत नाही. तो सर्वांना फळेच देतो. हजरत बाहू सांगतात :

ज्योंदया मर रहणां होवे तां वेश फकीरी बहिए हू।
जे कोई सिट्टे गुद्दड़ कूड़ा वांग अरूड़ी रहिए हू।
जे कोई कड्डे गाल उलांभा जी जी ओहनूं कहिए हू।।

संतांची वाणी कोणत्या भावनेने समजून घ्यावी ही वाचणाऱ्यांची व ऐकणाऱ्यांची मर्जी असते. तेथे कोणी भाव घेऊन येतो, तर कोणी अभाव. तो आप–आपला दृष्टिकोन असतो, परंतु संत दोहोंवरही प्रेम करतात.

संत सर्वांमध्ये परमात्म्यास पाहतात आणि सर्वांनाच परमात्म्याची मुले मानून प्रेमदेखील करतात. त्यांच्या दृष्टीने स्त्री–पुरुष असा भेदभाव नसतो, त्यांच्या हृदयामध्ये कोणत्याही देशाप्रती घृणा नसते. ते सर्वांवरच प्रेम करतात.

फरीदा काले मैंडे कपड़े काला मैंडा वेस।।
गुनहीं भरया मैं फिरां लोक कहैं दरवेस।।

संत–महात्मा परमात्म्यास प्रिय असतात, ते या संसारात स्वत:ची सत्यता सिद्ध करण्यासाठी येत नाहीत. ते आपणा सर्वांस नम्रता आणि प्रेमाची शिकवण देण्यासाठी येतात. ते निर्मळ व पवित्र आहेत असे ते कधीच म्हणत नाहीत. किंबहुना ते आपणांस सांगतात,''बंधूनो! सर्वांत जास्त गुन्हे करणारा गुन्हेगार मीच आहे.'' कबीर साहेब सांगतात:

बुरा देखन मैं गया बुरा न मिलया कोए।
जब देखया दिल आपणा मुझसे बुरा न कोए।।

याचा अर्थ असा नाही की कबीर साहेब वाईट होते. त्यांनी आपणांस नम्रता व दीनता शिकविली व सांगितले,''बंधूंनो! परमात्म्यास अहंकार प्रिय नाही, नम्रता प्रिय आहे.'' आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत असत, ''प्रभूला प्राप्त करावयाचे असल्यास आपल्या अंतरात दीनभाव निर्माण करा, कारण सर्वांचा कर्ता–करविता प्रभू कोणासमोर दीन होईल?''

फरीद साहेबांच्या कारकिर्दीत सामान्यत: साधू–फकीर काळे वस्त्र परीधान करीत असत. त्यानंतर भगवी, श्वेत आणि इतर अनेक रंगांची वस्त्रे साधु–फकीर परिधान करू लागले. त्यामुळे फरीद साहेब सांगतात की लोक जेव्हा मला फकीर म्हणतात, तेव्हा मला खूप लज्जास्पद वाटते, कारण माझ्यात अनेक अवगुण आहेत. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

जप तप संयम धर्म न कमाया, सेवा साध न जाणया हर राया।
कहो नानक हम नीच कर्मा, शरण पड़े की राखो शरमा।।

सेवकाचे आयुष्य सार्थकी लावणारे त्याचे गुरूच असतात. जोपर्यंत गुरू देहात असतात, तोपर्यंत ते कधीही असा अहंकार करीत नाहीत की ते विद्वान आहेत, त्यांना काही खास कलागुण अवगत आहेत, त्यांनी ध्यान-अभ्यासाची साधना केलेली आहे किंवा चमत्कार करण्याची शक्ती त्यांच्यामध्ये आहे. सतगुरु सदैव आपल्या हृदयात नम्रता व प्रेम बाळगतात.

तत्ती तोय न पलवै जे जल टुब्बी देय।।
फरीदा जो डोहागण रब दी झूरेंदी झूरेय।।

आता आपण प्रेमाने अतिशय सुंदर उदाहरण देत आहात की एकदा का पाण्याअभावी शेतामधील पिक सुकले, जळून गेले, त्यानंतर तुम्ही त्या पिकास पाण्यात उभे जरी केले, तरी ते पुन्हा हिरवेगार होऊ शकत नाही. त्यास पुन्हा नवीन हिरवी पाने फुटत नाहीत, कारण ते पिक जळून गेलेले असते. आपण प्रेमाने समजावता की जे आत्मा सत्संगामध्ये येऊनही त्याचे महात्म्य समजून घेत नाहीत, त्या आत्म्यांस नंतर कायम झुरत राहावे लागते की अरेरे! मी माझे आयुष्य का वाया घालविले? संत-महात्म्यांचे सांगणे का ऐकले नाही? शब्द-नामाची साधना का केली नाही? मनास वाममार्गावरून हटवून सन्मार्गी का लावले नाही?

जां कुआरी ता चाओ वीवाही तां मामले।
फरीदा एहो पछोताओ वत कुआरी न थीऐ।।

यामध्ये स्त्री-पुरुषाचा प्रश्न नसतो. आपण जोपर्यंत अविवाहीत असतो, आपणांस वाटते की आपला विवाह व्हावा. विवाह झाल्यानंतर आपणांस मुले-बाळे होतात. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाचा खर्च तसेच त्याचे विवाहसंबंध जोडताना आपणांस अनेक अडी-अडचणी येतात. मग अनेकदा मनुष्य असा विचार करतो की मी विवाहच केला नसता, तर किती बरे झाले असते? परंतु तोपर्यंत हातातून वेळ निघून गेलेला असतो. अशावेळी संत-महात्मा



आपणांस समजावतात की तुम्ही आता गृहस्थाश्रमामध्ये पाऊल ठेवले आहे. परमात्म्याने ज्या काही जबाबदाऱ्या तुम्हांस दिलेल्या आहेत, त्या जबाबदाऱ्या तुम्ही आनंदाने पूर्ण करा, घाबरू नका.

सेवकास जेव्हा नाम प्राप्त होते, तेव्हा त्याच्या हृदयात विचार येतो की, मी कोणत्या ना कोणत्या प्रकारे आपल्या आत्म्यास मन–इंद्रियांच्या दुष्कर्मी डावपेचां पलिकडे नेऊन शब्द–नामाशी समरस व्हावे, कधी माझ्या अंतर्यातील पडदा उघडेल? व कधी मला सतगुरूंच्या तेजोमय प्रकाशाचे दर्शन घडेल?

परमात्मा अन्यायी नाही. आत्मा जेव्हा प्रेमभावनेने आपले ध्यान एकाग्र करून तिसऱ्या तिळावर पोहचतो, तेव्हा परमात्मा अंतर्यातील पडदा दूर करतो. जेव्हा अंतर्यातील पडदा दूर होतो, तेव्हा परमात्मा त्या आत्म्यावर खूप मोठी कामगीरी सोपवितो की जे आत्मे परमात्म्याशी एकरूप झालेले नाहीत त्या आत्म्यांना परमात्म्याशी जोडावे. परंतु या जगातील आत्म्यांना परमात्म्याचा संदेश देण्याचे काम अतिशय अवघड असते. या संसारात हे संदेश देण्याचे काम त्या आत्म्यांना खूप कष्ट सहन करीत करावे लागते. त्यामुळे ते आत्मा पस्तावतात की आपण इतका ध्यान अभ्यास का केला की ज्यायोगे त्यांच्यावर ही जबाबदारी पडली? परंतु ज्या आत्म्यांना एकदा तो मिठीत घेतो, त्या आत्म्यांना तो दूर सारत नाही. कबीर साहेब सांगतात:

राम बुलावा भेजया दिया कबीरा रोय।
जो सुख साधु संग है सो बैकुंठ न होय।

कल्लर केरी छप्पड़ी आय उलत्थे हंझ।।
चिंजू बोड़न ना पीवह् उडण संदी डंझ।।

आता आपण एका हंसाचे उदाहरण देऊन सांगत आहात की एकदा हंस एका कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर जाऊन बसला व तेथे त्याचे अन्न, मोती शोधू लागला. परंतु त्याच्या चोचीमध्ये जळमटे व कचराच आला. तेव्हा हंसाने

विचार केला की, यावर चोची मारण्याऐवजी मी येथून उडून जावे. तेवढ्यात शेतकरी तेथे हातामध्ये काठ्या घेऊन हंसास हाकविण्यासाठी आले, परंतु त्यांना कल्पना नव्हती की हंस कधी घाण खात नाही.

याचप्रमाणे परमात्म्याचे प्रियजन या संसारात येऊन आपणांस प्रेमाची शिकवण देतात, परंतु आपण त्यांचा छळ करू लागतो. संत–महात्मे कोणाच्याही मालमत्तेवर अधिकार गाजविण्यासाठी येत नाहीत. ते एखाद्या प्रवाशाप्रमाणे येथे चार दिवस व्यतीत करण्यासाठी येतात. कारण त्यांना कल्पना असते की परमात्म्याकडून कधीही बोलावणे येऊ शकते, त्यावेळी आत घेतलेला श्वास बाहेर येण्याचाही अवधी लाभणार नाही. लोकांनाही, ते महात्मा किती काळ येथे राहणार आहेत, याची कल्पना नसते.

पंजाबमध्ये संधु नावाचे अतिशय जुने गांव आहे. मी तेथे सत्संग करण्यासाठी गेलो असता, मला तेथे किल्ल्याचे जुने अवशेष दिसले. ते पाहून मी त्या लोकांना विचारले, हे कसले अवशेष आहेत? येथील जमिनीची अवस्था उजाड का आहे? त्या लोकांनी मला सांगितले की, दोनशे वर्षांपूर्वी येथे आठ घरे होती आणि आजदेखील येथे आठच घरे आहेत. आम्हांस एका साधूचा शाप आहे की येथे आमची प्रगती व कुटुंब विस्तार होणार नाही.

त्या गावातील लोकांनी सांगितले की, येथे एक साधू तपोभ्यास करीत असे. एकदा गावामधील काही लोकांनी त्या साधूस सांगितले की, आम्हांस येथे किल्ला तयार करावयाचा आहे, म्हणून तुम्ही तुमचे स्थान एका बाजूस हटवावे. साधू म्हणाले की तुम्ही किल्ल्याची भिंत थोडीशी मागे घेतली तर काय हरकत आहे? गावकरी साधूस म्हणाले, तू या जमिनीचा मालक आहेस काय? साधू म्हणाले की, मी मालक नाही परंतु तुम्ही थोडे मागे सरकण्यास काय हरकत आहे? साधूने त्यांना खूप विनंती–आर्जव केली, परंतु गावकऱ्यांनी त्या साधूस बैलांमागे बांधून दिवसभर फिरवत राहिले. अखेरीस तो साधू मरण पावला.

साधू कधी कोणास शाप देतात? ते म्हणाले, तुमचेही सर्व सामान मृत्युपश्चात अखेरीस येथेच राहणार आहे आणि माझेही. परंतु निसर्ग मात्र प्रत्येक व्यक्तीचा श्वासोश्वासाबरोबर झालेल्या कर्मांचा हिशोब घेतो. त्याकाळी नेहमी दरोडे पडत असत, तेव्हापासून गावात अशी प्रथा लागू झाली की सर्वांनी एकत्र रहावे, सर्वांनी एकत्र होऊन लग्नाच्या वरातीत सहभागी व्हावे. आज या सर्व गोष्टींचा रिती-रिवाज बनलेला आहे.

हंस उडर कोध्रै पया लोक विडारण जाय।।
गहिला लोक न जाणदा हंस न कोध्रा खाय।।
चल चल गईआं पंखीआं जिनीं वसाए तल।।
फरीदा सर भरया भी चलसी थक्के कवल इकल।।

आता आपण सांगता की या जगात अनेक श्रीमंत लोकांनी मोठ-मोठे किल्ले बांधले, परंतु जग सोडून जाताना ते रिकाम्या हातीच गेले व आपणांसही रिक्त हातांनीच जावे लागणार आहे. नामदेवजी त्यांच्या वाणीमध्ये लिहितात:

मेरी मेरी कौरव करते दुर्योधन से भाई।
बारह योजन छत्र झुला था देही गिरज न खाई।।
सरब सोने की लंका होती रावण से अधिकाई।
कहाँ भए दर बांध्यो हाथी खिन्न में भई पहाई।।

फरीदा इट सिराणे भोएं सवण कीड़ा लड़यो मास।।
केतड़यां जुग वापरे इकत पयां पास।।

आपण प्रेमाने सांगता, 'हे बघा प्रिय बंधुंनो! सुंदर मऊ रेशमी मखमली गाद्यांऐवजी तुम्हांस, थडग्यामध्ये जमिनीवर झोपावे लागेल व विटांची उशी मिळेल. तेथील किडे तुमचे मांस कुरतडून खातील. तेथे निद्रावस्थेतून तुम्हांस कोणीही उठविणार नाही. थडग्यामध्ये तुम्हांस किती काळ व्यतीत करावा लागेल याची कल्पना नाही. कबीर साहेब सांगतात:

जां जलिये तां होय भस्म तन रहे किरम दल खाई।

आपल्या शरीरास अग्नी दिला तर ते जळून त्याचे मुठभर राखेत रूपांतर होते. ते थडग्यामध्ये ठेवल्यास अनंत किडे थोड्याच वेळामध्ये त्यास कुरतडून–कुरतडून खाऊन टाकतात.

फरीदा भंनी घड़ी सवंनवी टुट्टी नागर लज्ज।।
अजराईल फरेसता कै घर नाठी अज्ज।।

फरीदसाहेब सांगतात,''हा देह अतिशय सुंदर असून, त्यावर सर्वच जण प्रेम करतात. यामध्ये श्वास रूपाने माला फिरत आहे. परंतु ही माला कधी तुटणार आहे, त्याचे कोणासही ज्ञान नाही. मृत्यूदेव कोणाच्या घरी त्यास नेण्यासाठी पाहुणा बनून येणार याची कोणालाही कल्पना नाही. मृत्यूदेवावर कोणाचेही वर्चस्व नाही.''

परमात्म्याने आपणांस एवढे सुंदर शरीर दिलेले आहे. त्यामध्ये श्वासांच्या रूपाने असलेली माला जेव्हा तुटते तेव्हा नेत्र पूर्वीप्रमाणेच पाहत असतात, परंतु त्यामधील तेज निघून गेलेले असते. त्यामुळे या नेत्रांना आपण खाली–वर करू शकत नाही. तोंडात जिव्हा पूर्वीप्रमाणेच असते, परंतु आपण जसे आता बोलत आहोत, तसे बोलू शकत नाही. तसेच शरीरास पाय पूर्वीप्रमाणेच असतात, परंतु ते हालचाल करू शकत नाहीत.

परमात्म्याने कृपा करून आपणांस सुंदर शरीर दिले आहे. आपले नेत्र खराब झाल्यास आपण मूल्य चुकते करूनही पुन्हा तसेच नेत्र प्राप्त करू शकत नाही. जर आपले पाय निकामी झाल्यास आजच्या युगात भले कृत्रीम हात–पाय लावले जातात, परंतु ते कृत्रीम पाय मूळच्या पायांप्रमाणे नसतात. तसेच हात निकामी झाल्यास, त्यांच्याऐवजी लावले गेलेले कृत्रीम हात नैसर्गिक हातांप्रमाणे नसतात. अनेक प्रेमींनी त्यांच्या नेत्रांची शस्त्रक्रिया करवून घेतलेली आहे. मी जेव्हा त्यांना विचारले, काय बंधु! नजर व्यवस्थित झाली का? त्यांनी उत्तर दिले, होय! सर्व स्वच्छ व दूरपर्यंत पाहू शकतो.

जेव्हा माझ्या नेत्रांची शस्त्रक्रिया झाली तेव्हा मी अनुभवले की पूर्वीप्रमाणे स्वच्छ दिसत नाही. तेव्हा मी डॉक्टरांना विचारले की मला दूरवर दिसते परंतु स्पष्ट दिसत नाही. डॉक्टर फार समंजस होता, तो म्हणाला महाराजजी! निसर्गाने दिलेल्या दृष्टीसारखी दृष्टी पुन्हा होऊ शकत नाही. ही तर केवळ काम चलावू आहे.

महात्मा प्रेमाने सांगतात की आपल्यावर दया करून परमात्म्याने आपणांस अतिशय सुंदर स्वरूप दिले आहे. आपल्या शरीरामध्ये कार्यरत असलेल्या श्वासरूपी माळेमुळेच आपले आई–वडील, बंधु–भगिनी, मित्र–मंडळी, सर्वजण आपला आदर करतात. परंतु जेव्हा या श्वासरूपी माळेचे कार्य थांबते, तेव्हा आपले पार्थीव शरीर कोणीही सांभाळून ठेवण्यास तयार नसतात. त्या देहाच्या बदल्यामध्ये कोणी एखादी कवडीदेखील मूल्य म्हणून देण्यास तयार नसतात. कबीर साहेब सांगतात:

तन ते प्राण होत जब न्यारे, टेरत प्रेत पुकार।
आधी घड़ी कोऊ न राखत घर ते देण निकार।।

फरीदा भंनी घड़ी सवंनवी टुट्टी नागर लज्ज।।
जो सज्जण भोएं भार थे से क्यों आवह् अज्ज।।

धरतीवर अशा सज्जनांचादेखील भार आहे की जे आयुष्यभर मी–मी करत असतात, कधीही **परमात्म्याची भक्ती** करीत नाहीत. ते ना कोणास चांगला सल्ला देतात, ना स्वत: चांगले आचरण करतात. खरेतर असे जीव धरतीसाठी भारावतात. कबीर साहेब सांगतात:

जो प्रभ कीये भक्त ते वांझ तिन ते सदा डराने रहिए।

या संसारातून सत्कर्मे करणाऱ्यांनाही जावे लागणार आहे तसेच दुष्कर्मे करण्याऱ्यांना देखील जावे लागणार आहे. परंतु सत्कर्मे करणाऱ्यांना परमात्म्याच्या घरातील शोभा अनुभवयास मिळते व दुष्कर्मे करणाऱ्यांना निर्भर्त्सना सहन करावी लागते.

फरीदा बे निवाजा कुत्तया एह न भली रीत।।
कबही चल न आया पंजे वखत मसीत।।

आपण प्रेमाने सांगता, बंधू! तू कधी मशीद, मंदिर किंवा गुरूद्वाऱ्यामध्ये गेलास का? आपण प्रेम भावाने जी काही धर्मस्थळे तयार केली आहेत, त्यामागे हाच हेतू असतो की आपण जे काही तेथे ऐकतो, त्यावर अंमल करावा, त्यांची पवित्रता राखावी. काही काळ तरी घरदाराची कामे सोडून या धर्मस्थळी जाऊन **परमात्म्याची भक्ती** करावी, ध्यान-अभ्यास करावा. ही धर्मस्थळे केवळ रिती-रिवाज करण्यासाठी बनविलेली नाहीत, ही तर स्वत:चा सुधार व्हावा म्हणून बनविलेली आहेत. मुस्लिमांसाठी मशिदीमध्ये पाच वेळा जाऊन नमाज पढणे आवश्यक आहे. गुरू नानकदेवजी सांगतात:

पंज नवाजा वक्त पंज पंजे पंजा नाओ।

सर्वप्रथम हीच माला जपावी की आपली वृत्ती स्वच्छ ठेवावी, स्वभाव शांत ठेवावा, स्वमेहनतीने व योग्यमार्गाने केलेल्या मिळकतीतून उदर-निर्वाह करावा. आपले हृदय मेणासमान मऊ करून इतर जिवांवर दया करावी. ज्या परमात्म्याने तुला जन्म दिला आहे, तू त्या **परमात्म्याची भक्ती** कर.

उठ फरीदा उजू साज सुबह निवाज गुजार।।
जो सिर साईं ना निवै सो सिर कप्प उतार।।

फरीद साहेब आपणांस सावधान करीत आहेत की हे बघा प्रियजनहो! तुम्ही सकाळी उठा. पूर्ण स्नान करणे शक्य नसल्यास पंचस्नान करावे. या पंचस्नानास मुसलमान उजू असे संबोधतात. सकाळी अमृतवेळेस उठून परमात्म्याशी एकरंग व्हा, **परमात्म्याची भक्ती** करा. त्यावेळी परमात्म्यासमोर जे शिर झुकत नसेल, त्या शिराचा काय उपयोग? त्या शिरास छाटून टाकावे. आपण सांगता:

हौं बलिहारी पंखियां जंगल जिन्हां वास। कंकर चुगन थल वसन रब न छोडन पास।।

मी त्या पशु–पक्ष्यांवर आपले बलिदान करतो जे जंगलात राहतात,गर्मी–थंडीपासून स्वत:चा पूर्ण बचाव करू शकत नाहीत, वादळ–वाऱ्यात फसून मरतात, तरीही ते पहाटे उठून आपल्या बोलीत परमात्म्याचे स्मरण करतात.

जो सिर साईं ना निवै सो सिर कीजै कांय।।
कुंने हेठ जलाईऐ बालण सदै थांय।।

फरीद साहेब खास कोणासही हा ज्ञानोपदेश करीत नाहीत, तर ते स्वत:सच सांगतात की जे शिर पहाटे परमात्म्यासमोर त्याच्या भक्तीभावामध्ये झुकत नाही, त्या शिरास छाटून अग्नीमध्ये जाळून टाकावे, कारण मुसलमान लोक जाळण्याच्या प्रक्रियेचा तिरस्कार करतात. आपण त्याच धर्माचे असूनही जाळले जावू नये याची पर्वा करीत नाहीत. आपण स्वत:चा सुधार करण्यासाठी विचार करतात की **परमात्म्याची भक्ती** करणे का अत्यावश्यक आहे.

फरीदा कित्थै तैंडे मापयां जिनीं तूं जणयों।।
तैं पासों ओय लद गए तूं अजै न पतीणों।।

फरीद साहेब सांगत आहेत,''तू शांतपणे विचार करू पहा! तू आपल्या कुळाचा अहंकार कसतोस की तुझे कुळ किती उच्च आहे. तुझे आई–वडील कोठे आहेत? ते देखील याच कुळात जन्मले होते, ते येथून निघून गेले आहेत व ते जाताना सांगूनही गेले नाहीत की ते कोठे जात आहेत? तरीही तुझ्या हृदयास अजूनही जाग आली नाही की आपण **परमात्म्याची भक्ती** करावी, परमात्म्याचे प्रिय बनावे.''

मी नेहमी सांगतो की घरात जेव्हा मृत्यू येतो, तेव्हा मुलगा आईशी वा वडील आपल्या मुलाशी कोणतीही सल्लामसलत करीत नाही. वेळ आल्यावर सर्वजण आपआपल्या मार्गाने निघून जातात, जाताना कोणीही कोणास सांगून जात नाही. एखाद्याचा मृत्यू झाल्यास आपण त्यास आपल्या खांद्यावरून स्मशानामध्ये नेतो, परंतु हे विसरतो की एके दिवशी आपलेदेखील असेच

होणार आहे. आपणांस असे वाटते की मृत्यू इतर लोकांकरीताच आहे, कदाचित! आपल्यावर अशी वेळ येणार नाही.

फरीदा मन मैदान कर टोए टिब्बे लाह।।
अग्गे मूल न आवसी दोजक संदी भाह।।

एका मनुष्याने फरीब साहेबांना प्रश्न विचारला की परमात्म्यास प्राप्त करण्याचा उपदेश आपण आम्हांस करावा, ज्यायोगे आम्ही परमात्म्यास भेटू शकू. फरीद साहेब म्हणाले,''सर्वप्रथम तुम्ही तुमच्या मनरूपी मैदानास स्वच्छ करा. तुमच्या अंतरात काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार तंबू ठोकून बसलेले आहेत. ते तुमची पाठ काही सोडत नाहीत. परंतु तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. मग तुम्हांस नरकातील अग्नीस सामोरे जावे लागणार नाही.''

फरीदा खालक खलक मह खलक वसै रब माहिं।।
मंदा किस नों आखीऐ जां तिस बिन कोई नाहिं।।

ही आता गुरू अर्जुनदेवजींची वाणी आहे. आपण सांगता, हे बघ फरीद! सर्व विश्व परमात्म्यामध्ये वसत असून परमात्मा सर्व विश्वामध्ये वसतो. आपण कोणास वाईट म्हणावे? कोणाचा तिरस्कार करावा? हे जग परमात्म्याशिवाय टिकू शकत नाही. परमात्मा सर्वांच्याच अंतरामध्ये वसत आहे. तुम्ही विचार करा! कोणास वाईट लेखणे, एखाद्या समाजाचा वा धर्माचा तिरस्कार करणे म्हणजे आपण परमात्म्याचाच तिरस्कार करण्यासमान आहे.

आपले कर्तव्य आहे की महात्म्यांची वाणी प्रेमपूर्वक आणि शांत हृदयाने समजून घ्यावी. कोणाचाही तिरस्कार करू नये. काळ कधी बोलावणे धाडेल याची आपणांस कल्पना नाही. परमात्मा सर्व विश्वामध्ये सामावलेला आहे, तसेच विश्व परमात्म्यामध्ये वसत आहे. आपण सर्वांना परमात्म्याचेच विश्व मानून सर्वांवर प्रेम करणे आवश्यक आहे.

***

लग्न

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींना दिलेला महत्मपूर्ण संदेश,
सन्त बानी आश्रम, अमेरीका – २३ जून १९७७



मी लग्नाचा हा विधी पाहून खूप खूष व प्रभावित झालो परंतु या संदर्भात मी दोन–चार शब्द बोलू इच्छितो. जर पश्चिमी देशांतील प्रेमींनी त्यावर अमल केल्यास प्रत्येकाचे जीवन सोपे होईल.

आपणांस सर्वप्रथम हे माहीत असणे आवश्यक आहे की, लग्न का केले जाते? लग्नाचे कोणते फायदे आहेत? व जर आपण लग्नाच्या नियमांचे पालन केले नाही तर त्यापासून काय नुकसान होते?

भारतात देखील लग्न एखाद्या धर्मगुरू, भाई, पादरी किंवा महात्माजींच्या उपस्थित नातेवाईकांच्या समक्ष बसून केले जाते. प्राचीन काळी मनुष्य जंगलात जनावरांप्रमाणे जीवन जगत होता, त्याला माहीत नव्हते की, कशा प्रकारे शरीर झाकले पाहिजे आणि राहण्यासाठी घर बनवले पाहिजे किंवा कशा प्रकारे एकमेकांचा आदर करावा?

परमात्म्याने संसारातील मनुष्यांना मर्यादाशील बनविण्यासाठी ऋषी-मुनी आणि साधूंना संसारात पाठविले की, तुम्ही जाऊन लोकांना जीवन जगण्याची रीत आणि मर्यादा सांगावी. ऋषी-मुनी आणि साधूंनी आपल्याला सांगितले की, स्त्री-पुरुषांचा जोडा जीवनाचा प्रवास सुखकर व सुलभ बनविण्यासाठी बनवला गेला आहे.

जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीस आपल्या सहचरीच्या रूपांत निवडतो, कुलदेवते पुढे उभे राहून लग्नाचा विधी संपन्न करतो, तेव्हा आपण हा प्रण (शपथ घेतो) करतो की, आम्ही एकमेकांचा सुख-दुःखांत साथ देऊ. काही काळापर्यंत ही परंपरा व्यवस्थित चालली. पती-पत्नी एकमेकांस साथ देऊन धर्म निभावत राहिले.

विवाहबंधनास निभावून नेणे स्त्री आणि पुरुष या दोघांचेही कर्तव्य आहे, परंतु खेदाने सांगावे लागते की, पश्चिमी देशातील लोक आपण केलेला प्रण तोडून परीस्थिती घटस्फोटापर्यंत आणतात. मग स्त्री-पुरुषाची कदर करीत नाही आणि पुरुष स्त्रीची कदर करीत नाही. ही फार वाईट गोष्ट आहे की आपण विवाहधर्म निभावत नाही व आपले जीवन नष्ट करतो.

जर आपण कुलदेवतेच्या, महात्म्यांच्या किंवा समस्त नातेवाईकांच्या समोर बसून एकमेकांची साथ निभावण्याचा प्रण करतो, तर आपण हा प्रण तोडता कामा नये. जरी कोणतीही समस्या आली, आपण प्रेमाने ती सोडवली पाहिजे व ह्या परंपरेला जन्मभर कायम ठेवले पाहिजे.

संतमतात हे विशेष लिहिले आहे की, जर एखादा पुरुष परक्या स्त्रीकडे गेल्यास त्याच्यावर अनेक पापांचा भार होतो. जर एखादी स्त्री आपल्या पतीला सोडून परपुरुषाकडे गेली तर ती आपल्या डोईवर असंख्य पापांचा भार एकत्र करत आहे. लग्नाचा अर्थ कामवासना नाही, आपल्या जीवनाचा प्रवास सहज-सोपा बनवणे आहे. गुरू नानक साहेब सांगतात:

कामवन्त कामी बोह नारी पर गृह जोय न चूके।
दिन परत करे करे पछतापे लोभ मोह में सूक।।

कामवासनेत पडून एखादा पुरुष कितीही स्त्रियांकडे गेला आणि एखाद्या स्त्रीने कामवासनेत पडून जरी कितीही पुरुषांना भोगले तरी तिची कामवासना कमी होणार नाही, उलट ती आणखी भडकेल. आपण कामेंद्रियांच्या वशी जाऊन रात्रं–दिवस पाप कमावत आहोत व पश्चाताप देखील करत आहोत. काम भोगल्यामुळे काही आनंद होत नाही. जे सत्संगी असे म्हणतात की, आमची ध्यान–अभ्यासात प्रगती होत नाही त्यांच्यात हीच कमतरता असते.

कबीर साहेब सांगतात, ''जिथे काम आहे, तिथे नाम प्रगट होत नाही. जिथे नाम आहे तिथे काम कधीही पाय देखील ठेवू शकत नाही. जिथे दिवस आहे, तिथे रात्र नाही. जिथे रात्र आहे, तिथे दिवस नाही.'' लग्न करणे हे काही वाईट कर्म नाही. विवाहित जीवन व्यतीत करणे चांगले असते. मी त्याची कदर करतो. परंतु प्रत्येकास विवाहबंधनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.

आपण आता देखील भारतात पाहू शकतो की, जरी पती कितीही गरीब झाला, आजारी पडला किंवा त्यावर कोणतेही दु:ख कोसळले, तरी पत्नी त्याला सोडून जात नाही. जर बायकोवर देखील एखादे संकट आले किंवा आजारपण ओढावले तर पती तिच्यावर सढळ हाताने पैसा खर्च करतो आणि सर्वप्रकारे मदत करतो. ते कधीही एकमेकांस सोडण्याचा विचार देखील करू शकत नाहीत. पतिव्रता धर्मात खूप शक्ती असते.

फरीद साहेबांनी गळ्यात लोखंडी साखळदंड घालून विहिरीत लटकून बारा वर्षे तप केले. फरीद साहेबांनी विचार केला की, पाहूया तरी, ह्या तपात काही ताकद आहे का? तिथे चिमण्या दाणे टिपत होत्या. फरीद साहेबांनी त्या चिमण्यांना शाप दिला की, मरून जा, त्या चिमण्या मेल्या. परत त्या चिमण्यांना सांगितले की, उडून जा, त्या चिमण्या उडून गेल्या.

फरीद साहेबांना वाटले की, मी खूप शक्ती प्राप्त केली आहे, आता घरी जाऊया. जेव्हा फरीद साहेब घराकडे चालले होते, तेव्हा वाटेत आपण पाहिले की, एक विवाहित मुलगी विहिरीतून पाण्याची घागर भरून आपल्या पायावर ओतत जात होती. आपण त्या मुलीला म्हटले, ''मला पाणी पाज.''त्या मुलीने सांगितले,''थोडा वेळ थांबा मी पाणी पाजेन.'' ती पाणी भरून आपल्या पायावर ओतत राहीली तेव्हा फरीद साहेबांनी त्या मुलीला सांगितले,''तू मला लवकर पाणी पाज नाही तर मी तुला शाप देईन.'' मुलगी म्हणाली, ''मी चिमणी नाही, तू जिला मरण्यासाठी सांगशील तेव्हा ती मरून जाईल आणि जेव्हा उडण्यासाठी सांगशील तेव्हा ती उडून जाईल. माझे घर येथून बरेच दूर आहे. माझ्या घराला आग लागलेली आहे, मी आपल्या घरची आग विझवून नंतरच तुला पाणी पाजेन.'' फरीद साहेबांना खूप आश्चर्य वाटले की, मी बारा वर्षे विहिरीत लटकून इतकी कठीण तपश्चर्या केली आहे व हिला इतकी शक्ती कशी प्राप्त झाली? फरीद साहेबांनी तिला विचारले, ''तू इतकी शक्ती कोठून प्राप्त केलीस?'' त्या मुलीने सांगितले, ''मी ही शक्ती आपल्या पतीची सेवा करून प्राप्त केली. मी आपल्या पतीव्रता धर्मांत दृढप्रतिज्ञ आहे.'' स्त्री असो वा पुरुष असो, प्रत्येकाने आपल्या धर्मांत दृढप्रतिज्ञ राहिले पाहिजे.

शिख इतिहासातील एक प्रसिद्ध घटना आहे. ज्यावेळी गुरू अर्जुनदेवजी महाराज श्री अमृतसर साहबमध्ये सुवर्ण मंदिराच्या बांधकामाची सेवा करून घेत होते, त्या वेळी एक स्त्री तेथे सेवा करत होती. ती डोक्यावरून टोपली उतरवून आपले दोन्ही हात अशा प्रकारे हलवत होती, जसे झोपाळ्यास झोका देतात. काही सेवादारांनी विचार केला, कदाचित ही वेडी असावी.

एका सेवादाराने त्या स्त्रीला विचारले, ''तू टोपली उतरवून ह्याप्रमाणे हातवारे का करतेस?'' त्या स्त्रीने सांगितले, ''माझे घर येथून तीन मैल दूर आहे. मी आपल्या मुलाला झोपाळ्यात निजवून आले आहे. मी अशा प्रकारे



हात हलवून झोपाळ्यास झोका देते की, माझा मुलगा झोपून राहू देत आणि मी इथे सेवा पण करीत राहीन.'' सेवादाराने विचारले की, ''तू इतक्या लांबून आपल्या मुलाच्या झोपाळ्यास झोका कसा देऊ शकतेस? तुझ्यात इतकी शक्ती कोठून आली?'' ती स्त्री म्हणाली,''पतीव्रता धर्मपालनामुळे माझ्यात ही शक्ती आहे. मला माझा मुलगा तीन मैलावरून दिसतो.''

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जसे आई-वडील असतात, तशीच मुले बनतात.'' आपण एक खूप प्रसिद्ध उदारहण देऊन समजवता की, एका राजाच्या मुलीचे कोणत्या दुसऱ्या राजाच्या मुलाबरोबर प्रेम जडले. मुलीकडच्या लोकांनी सांगितले की, आपण मुलाचा विवाह आमच्या मुलीबरोबर करून द्या, परंतु त्यांनी नकार दिला. म्हणून मुलीने मुलाला सांगितले की, आपण नकळत कुठे दूर जाऊन लग्न करूया.

एका रात्री मुलगा-मुलगी उंटीणीवर बसून घरातून बाहेर पडले. वाटेत एक नदी आली, उंटीण त्या नदीत बसू लागली तेव्हा मुलीने मुलाला म्हटले, हिचा लगाम ओढ,ही पाण्यात बसते. तिच्या आईला देखील पाण्यात बसण्याची सवय होती. मुलाने विचार केला, जर जनावरांवर देखील आपल्या आई-



वडिलांचा परिणाम होतो, तर मग ज्या मुलीला मी आज घेऊन जात आहे, तिच्या पोटातून जे मूल जन्माला येईल ते देखील हिच्या प्रमाणेच कोणाबरोबर पळून निघून जाईल. मुलाने मुलीला सांगितले की, अजून खूप रात्र बाकी आहे. मी एक खूप महत्त्वाची वस्तू घरी विसरून आलो आहे. आपण ती वस्तू घेऊन परत येऊ. परत पोहोचल्यावर मुलाने मुलीला हात जोडून सांगितले, ''तू तुझ्या घरी जा, मी आपल्या घरी जातो.'' महाराज सावन सांगत असत, जर आपण सद्‌गुणी व सदाचारी नसलो तर आपली मुले देखील सद्‌गुणी व सदाचारी बनणार नाहीत. म्हणून सर्वप्रथम आई-वडिल स्वत: लायक बनले पाहिजेत त्यामुळे मुलांवर चांगला परिणाम पडेल.

मी ह्या जोडप्यांना शुभेच्छा देत हे देखील सांगेन की आपले जीवन सुखी बनविण्यासाठी आपल्या जीवनसाथीसोबत विवाह बंधनाच्या नियमांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करा. त्यामुळे इतर लोकही आपले जीवन पाहून फायदा घेतील. आपण आपल्या परंपरेला सदैव कायम ठेवा जेणेकरून घटस्फोटाची पाळी येऊ नये. कोणत्याही जातीत घटस्फोटाला योग्य समजले जात नाही. फक्त करप्शन(दुष्कृत हेतू) मुळे आपण त्यास एक रीतीरिवाज बनवले आहे. ज्याप्रमाणे आज आपण प्रण केला आहे, त्यास प्रेमाने जीवनभर निभावा.

***